## निशाणी क्र. २८ वरील आदेश

वादी व प्रतिवादी क्र. ०७ व ०८ यांचेतर्फे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रकरणात हजर झालेल्या इतर प्रतिवादींतर्फे प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल न केल्याने व युक्तिवादासाठी कोणीही हजर न राहिल्याने त्यांच्या म्हणण्याशिवाय व युक्तिवादाशिवाय अर्ज पुढे चालविण्यात आला. अभिलेख पाहिले.

२. अभिलेखावरून प्रस्तुतचा दावा हा वाटप, ठराव व निरंतर मनाई हुकुम मिळणेसाठी दाखल करण्यात आला आहे. अर्जातील कथनांप्रमाणे, प्रतिवादी क्र. ०७ व ०८ यांनी प्रतिवादी क्र. ०५ चे लाभात खरेदीखत दस्त क्र. ३७९३/२०२३ अन्वये दावा मिळकती पैकी ०.११ आर विक्री केल्याने त्या अनुषंगाने खरेदीखत बेकायदेशीर असल्याचे जाहीर ठराव करून मिळणेसाठी व सदरचा दस्त वादीच्या हिस्सावर बंधनकारक नसल्याचे ठरावाने घोषित करून मिळणेसाठीचा मजकुर नव्याने समाविष्ट करण्यासाठी सदरची दुरूस्ती प्रस्तुत अर्जाद्वारे मागितली आहे. प्रतिवादी क्र. ०७ व ०८ तर्फे असे म्हणणे सादर केले आहे की, प्रतिवादी क्र. ०७ व ०८ यांना वादीच्या वडिलांनी मिळकत फरोक्त खरेदीने विक्री केलेली असुन सदर प्रतिवादींनी नोंदवुन दिलेल्या खरेदीखतासंबंधी तक्रार करण्याचा वादींना अधिकार नाही. अर्जातील दुरूस्तीमुळे दाव्यातील मुळ स्वरूप बदलुन दाव्यात गुंतागुत निर्माण होणार आहे. त्यामुळे दाव्याचा अंतिम निर्णय होण्यास विलंब होणार आहे. अर्ज मंजुर केल्यास सदर प्रतिवादींचे कधीही न भरून येणारे नुकसान होईल. त्यामुळे अर्ज रद्द करण्यात यावा.

३. प्रस्तावीत दुरूस्तीव्दारे दावा गुणदोषांवर अंतिमत: निकाली काढण्यासाठी व हुकुमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी दावा मिळकतीच्या अनुषंगाने उभय पक्षकारांमधील वादाचे मुद्दे निकाली काढण्याकरीता अर्ज मंजुर करणे गरजेचे आहे. प्रस्तावित दुरूस्तीव्दारे दाव्याचे मुळ मागणीमध्ये जादा मागणी समाविष्ट होत असली तरीही वाद मिळकतीच्या अनुषंगाने सर्व वाद मुद्दे एकाच प्रकरणात निकाली होण्यास मदत होईल.

४. अर्ज मंजुर केल्यास सदर प्रतिवादींचे कोणते नुकसान होईल हे अर्जात नमुद नसल्याने त्यांचे कधीही न भरून येणारे नुकसान होईल असे दिसुन येत नाही. याउलट अर्ज नामंजुर केल्यास वादींना वाद मिळकतीच्या अनुषंगाने त्यांची मागणी मागता येणार नाही व त्यांचेच जास्त नुकसान होईल असे दिसुन येते. अर्ज मंजुर केल्यास सदर प्रतिवादींना त्यांची विशोधित कैफियत मांडण्याची पुर्णपणे संधी मिळणार आहे. प्रस्तुत अर्जावर सदर प्रतिवादींना त्यांचे म्हणणे मांडावे लागल्याने त्यांचे झालेले वेळेचे नुकसान दुर्लक्षित करून चालणार नाही. सबब, न्यायाच्या दृष्टीकोनातुन उभय पक्षकारांचे न्यायालयीन कामकाजाचे प्रमाण टाळण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज खर्चाच्या अटीवर मंजुर करणे न्यायोचित होईल. सबब, खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्रमांक ०७ व ०८ यांस रक्कम रूपये २००/— इतका एकत्रितपणे खर्च देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२) वादींनी प्रस्तुतची दाव्यातील दुरुस्ती सदर आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसांमध्ये करुन घ्यावी व दाव्याची दुरुस्ती प्रत अभिलेखावर दाखल करावी. तसेच वादींनी जादा विनंती मागणीसाठी आवश्यक तो न्यायालयीन मुद्रांक कायद्यानुसार भरावा.

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.05.06 16:57:38 +0530

दिनांक: ०२/०५/२०२५

(आर.आर.कुलकर्णी)
सह दिवाणी न्यायाधीश,
क. स्तर, सिन्नर